प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 08, 2015

**ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी अर्ज मागविण्यासाठी आरबीआयकडून दुसरी फेरी**

ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी, संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करण्यासाठी आरबीआयने नवे अर्ज मागविण्याची दुसरी फेरी जाहीर केली आहे.

पात्र असलेल्या संस्थांद्वारे पूर्ण करावयाच्या अटींबाबतच्या तरतुदीही आरबीआयने सुधारित केल्या असून, समितीच्या (निकषांवरील मार्गदर्शक तत्वांचे परिच्छेद 11.3 (ब), 11.3 (क) व 11.9 (अ)(2)) निर्णयासाठीच्या कार्यरीतीसंबंधीच्या काही बाबी, (रिझर्व बँकेला पहिल्या फेरीत मिळालेल्या 90 अर्जांच्या मूल्यमापनामधून मिळालेल्या अनुभवावर आधारित) बदलण्यात आल्या आहेत. सुधारित मार्गदर्शक तत्वे जोडपत्र 1 मध्ये दिली आहेत.

भारतीय रिझर्व बँकेने, जानेवारी 9, 2015 रोजी, तिच्या वेबसाईटवर, ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी (डीईए निधी) मधून, आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी, संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करण्याचे निकष प्रकाशित केले आहेत. मिळालेल्या अर्जांच्या छाननीवर आधारित, 20 संस्था पंजीकरणासाठी पात्र असल्याचे दिसून आले होते. ठेवीदार-जाणीवेबाबतचे प्रयत्न अधिक खोलवर करण्याची गरज असल्याने आता अर्जांची दुसरी फेरी मागविण्याचे ठरविण्यात आले आहे.

**अर्ज कसा करावा ?**

पात्र असलेल्या संस्थांनी, जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज करुन त्यासोबत अर्जात दिलेल्या यादीमधील कागदपत्र जोडून, 8 जानेवारी 2016 रोजी व्यवहार बंद होण्यापूर्वी किंवा त्यापूर्वी, ते अर्ज, मुख्य महाव्यवस्थापक, बँकिंग रेग्युलेशन विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, 12 वा मजला, केंद्रीय कार्यालय बिल्डिंग, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई - 400 001 ह्यांचेकडे अर्ज पाठवावेत. जानेवारी 9, 2015 च्या वृत्तपत्र निवेदनानुसार, पहिल्या फेरीत, पंजीकरणासाठी अर्ज सादर केले असलेल्या संस्थांनी ह्या दुस-या फेरीत पंजीकरणासाठी अर्ज करु नयेत.

**पार्श्वभूमी**

बँकिंग कायदे (सुधारणा) अधिनियम, 2012 अनुसार, बँकिंग विनियम अधिनियम 1949 मध्ये कलम 26 अ घालण्यात आले आहे. हे कलम, भारतीय रिझर्व बँकेला ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी (डीईए फंड) स्थापन करण्याचे अधिकार प्रदान करते. त्यानुसार, रिझर्व बँकेने, जनतेकडून मते मागविण्यासाठी जानेवारी 21, 2014 रोजी तिच्या वेबसाईटवर, प्रारुप ठेवीदार शिक्षण व जाणीव योजना, 2014 (ही योजना) टाकली. ह्या प्रारुप निकषांवर मिळालेल्या सूचना व मतांवर आधारित, ही योजना तयार करण्यात आली आणि मे 24, 2014 रोजी कार्यालयीन राजपत्रात अधिसूचित करण्यात आली. ह्या योजनेद्वारे, संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करुन, ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यासाठी, त्या संस्थांना वित्तीय सहाय्य केले जाणे अपेक्षित आहे. त्यानंतर रिझर्व बँकेने, ह्या योजनेखाली, डीईए निधीमधून आर्थिक सहाय्य करण्यासाठी, संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करण्याबाबतचे प्रारुप निकष तयार केले व ते जनतेकडून सूचना/मते मागविण्यासाठी ऑक्टोबर 28, 2014 रोजी प्रसारित केले. ह्या प्रारुप निकषांवर मिळालेल्या सूचना/मतांवर आधारित, डीईए निधीमधून, आर्थिक सहाय्य करण्यासाठी, संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करण्यासाठीच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे अंतिम स्वरुपात तयार करण्यात आली, व जानेवारी 9, 2015 रोजी ती रिझर्व बँकेच्या वेबसाईटवर टाकण्यात आली.

**अल्पना किल्लावाला**

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/858** प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

| **संबंधित वृत्तपत्र निवेदने** | |
|---|---|
| ऑक्टोबर 1, 2015 | ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून (डीईए निधी) आर्थिक सहाय्य करण्यासाठी, संस्था, संघटना व संघांचे पंजीकरण करण्यासाठीच्या मंजुरी प्राप्त अर्जदारांची यादी आरबीआयद्वारे प्रसृत. |
| जानेवारी 09, 2015 | ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून आर्थिक सहाय्य मिळवू इच्छिणा-या संस्थांसाठीच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे आरबीआयद्वारा प्रसृत |
| ऑक्टोबर 28, 2014 | ठेवीदार शिक्षण निधीमधून आर्थिक सहाय्य मिळवू इच्छिणा-या संस्थांसाठीच्या निकषांवर, आरबीआय, जनतेकडून सूचना/मते मागवित आहे. |
| जानेवारी 21, 2014 | प्रारुप ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजना |
| जानेवारी 21, 2014 | ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजनेवर, आरबीआय, जनतेकडून सूचना/मते मागवीत आहे |

**ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून अर्थसहाय्य मिळविण्यासाठी संस्था, संघटना व संघ ह्यांचे पंजीकरण करण्यासाठीच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे**

**(1) पार्श्वभूमी**

बँकिंग कायदे (सुधारणा) अधिनियम, 2012 अनुसार, बँकिंग विनियम अधिनियम, 1949 मध्ये कलम 26 अ घालण्यात आले असून, त्यानुसार, ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी (हा निधी) ह्या नावाचा एक निधी स्थापन करण्याचा अधिकार रिझर्व बँकेला देण्यात आला आहे. त्यानुसार, जानेवारी 21, 2015 रोजी, रिझर्व बँकेने, जनतेकडून सल्लामसलत घेण्यासाठी, तिच्या, वेबसाईटवर, प्रारुप ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजना प्रदर्शित केली. ह्या प्रारुप निकषांवर मिळालेल्या सूचना/मते ह्यांच्यावर आधारित, ही ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजना, 2014 (ही योजना) तयार करण्यात आली व कार्यालयीन राजपत्रात, मे 24, 2014 रोजी अधिसूचित करण्यात आली.

(2) हा निधी निर्माण करण्यात आला असून सर्व बँकांना (प्रादेशिक ग्रामीण बँका व स्थानिक क्षेत्र बँका/नागरी सहकारी बँका/राज्य सहकारी बँका/जिल्हा केंद्रीय सहकारी बँका ह्यांच्यासह सर्व अनुसूचित वाणिज्य बँका) सांगण्यात आले आहे की, त्यांनी, दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ अकार्यकारी असलेल्या खात्यातील ठेवी, किंवा दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी हक्क न सांगण्यात आलेली इतर कोणत्याही ठेव खात्यातील रक्कम ह्या योजनेच्या परिच्छेद 3(7) मध्ये निर्देशित केल्यानुसार, ह्या निधीमध्ये हस्तांतरित करावी. तसेच, ह्या योजनेमध्ये विहित केल्यानुसार, बँकांनी, प्रत्येक कॅलेंडर महिन्यात देय (ड्यु) असलेल्या रकमा (म्हणजे, अकार्यकारी खात्यातील रकमा आणि दहा वर्षे किंवा अधिक काळ हक्क न सांगितल्या गेलेल्या शिल्लका) व त्यावरील व्याज, पुढील महिन्याच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी, ह्या निधीत हस्तांतरित कराव्यात.

(3) हा निधी, ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यासाठी, आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार, ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यासाठीच्या अन्य हेतूंसाठी वापरण्यात येईल. तथापि, दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळपर्यंत हक्क न सांगितल्या गेलेल्या ठेवी ह्या निधीमध्ये हस्तांतरित केल्या गेल्या असल्या तरीही, ठेवीदार, त्या बँकेकडून, त्या ठेवींवर हक्क सांगू शकतो किंवा ते खाते चालवू शकतो. बँकाही, अशा ठेवींची रक्कम ठेवीदाराला देण्यास बांधील असतील व ती रक्कम निधीमधून परत मिळविण्यास दावा करतील.

(4) ह्या योजनेच्या परिच्छेद 8(1) अनुसार, ही योजना प्रशासित व कार्यान्वित होण्यासाठी एक समिती स्थापन करणे आवश्यक आहे. ह्या योजनेच्या परिच्छेद 11(1) अनुसार, ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यासाठी, ही समिती, ठेवीदारांमध्ये जाणीव निर्माण करणे, शिक्षण देणे अशा कार्यकृतींमध्ये (तसेच बँकेच्या ठेवीदारांसाठी कार्यक्रम, सेमिनार्स व चर्चासत्रे आयोजित करणा-या आणि ह्या क्षेत्रांमधील संशोधन कार्यकृती - (पेज नंबर 13 चालु) करु इच्छिणा-या संस्थांसह) वेळोवेळी, निरनिराळ्या संस्था, किंवा संघ ह्यांचे पंजीकरण करु शकते/मान्यता देऊ शकते. ह्याशिवाय, ह्या योजनेच्या परिच्छेद 11(3) अनुसार, ही समिती, संस्था, संघटना व संघ ह्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतचे निकषही ठरवू शकते. त्यानुसार, ह्या योजनेखाली, ह्या निधीमधून, आर्थिक सहाय्य देण्यासाठी, संस्था, संघटना व संघ ह्यांचे

पंजीकरण करण्यासाठीचे प्रारुप निकष तयार करण्यात आले आणि ऑक्टोबर 28, 2014 रोजी ते, जनतेची मते/सूचना मागविण्यासाठी प्रसृत करण्यात आले. ह्या प्रारुप निकषांवर मिळालेल्या सूचना व मते हयांच्यावर आधारित, ह्या निधीमधून, आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी, संस्था, संघटना व संघ हयांचे पंजीकरण करण्याबाबतच्या निकषांसाठी पुढील मार्गदर्शक तत्वे अंतिम स्वरुपात तयार करण्यात आली. आणि ती जानेवारी 9, 2015 रोजी ह्या बँकेच्या वेबसाईटवर टाकण्यात आली. पहिल्या फेरीमध्ये मिळालेल्या अनुभवाच्या आधारावर, विद्यमान मार्गदर्शक तत्वांच्या, परिच्छेद 3(ब), 3(क) व 9(अ)(2) मध्ये काही बदल करण्यात आले. सुधारित मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**(2) मार्गदर्शक तत्वे**

**(1) पंजीकरणासाठी पात्र असलेल्या संस्था**

(अ) पंजीकरणासाठी पुढील संस्थांचा विचार करण्यात येईल.

बँक ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव हयांच्याशी संबंधित कार्यकृती आधीपासूनच करणा-या किंवा ठेवीदार शिक्षण कार्यक्रम, सेमिनार्स, चर्चासत्रे आयोजित करु इच्छिणा-या/प्रायोजित करणा-या, तसेच त्याबाबत संशोधन प्रायोजित करु इच्छिणा-या संस्था/संघटना/संघ.

(ब) अशा संस्था/संघटना/संघ पुढीलप्रमाणे असाव्यात :

(अ) सार्वजनिक धर्मदाय ट्रस्ट म्हणून स्थापन केले गेलेल्या

(ब) सोसायटीज् पंजीकरण अधिनियम, 1860 (1860 चा 21) खाली किंवा भारतामधील कोणत्याही भागामधील तदनुषंगिक अधिनियमाखाली पंजीकृत झालेल्या

(क) राज्य सहकारी सोसायट्या अधिनियमांखाली पंजीकृत झालेल्या

(ड) कंपन्या अधिनियम, 1956 च्या (1956 चा 1) कलम 25 खाली किंवा कंपन्या अधिनियम, 2013 च्या (2013 चा 8) कलम 8 खाली पंजीकृत झालेल्या

(ई) कायद्याने संस्थापित झालेले विश्वविद्यालय

(फ) सरकारद्वारे किंवा कायद्याने स्थापन झालेल्या कोणत्याही वि‍विद्यालयाने मान्यता दिलेली किंवा कायद्याने स्थापन झालेल्या कोणत्याही वि‍विद्यालयाशी संलग्न असलेली शैक्षणिक संस्था

(ग) सरकारने किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाने संपूर्णतः किंवा अंशतः आर्थिक सहाय्य केलेली संस्था किंवा

(ह) ह्या संघराज्याच्या सुरक्षादलाने, अशा दलाच्या आजी किंवा माजी सभासदांसाठी किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांसाठी स्थापन केलेला रेजिमेंटल निधी किंवा अ-सार्वजनिक निधी.

**(2) उद्दिष्टे**

बँक ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव वाढविण्या-संबंधाने असलेल्या कार्यकृती करण्यासाठी, किंवा ठेवीदारांसाठी शिक्षण कार्यक्रम, सेमिनार्स, चर्चासत्रे इत्यादी, (संशोधन कार्यकृतींसह) आयोजित करण्यासाठी, संस्था/संघटना/संघ ह्यांना आर्थिक सहाय्य करणे.

**(3) अर्हताप्राप्त संस्थांनी पूर्ण करावयाच्या आवश्यक अटी**

(अ) अशा संस्था/संघटना/संघ ह्यांचेकडे, त्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करण्यासाठी नियम, विनियम आणि/किंवा पोट-नियम असणे आवश्यक आहे. हे नियम, विनियम आणि/किंवा पोटनियम, पंजीकरणाच्या अटींना धरुन असावेत. अशा संस्था, संघटना, संघ ह्यांच्यावर नियंत्रक मंडळ/व्यवस्थापन समितीचे नियंत्रण/प्रशासन असेल. ह्याशिवाय, अशा संस्था/संघटना व संघ ह्यांच्या उद्दिष्टांमध्ये किंवा पोटनियमांमध्ये, त्यांचे उत्पन्न किंवा ॲसेट्सचा उपयोग "धर्मादाय हेतु" शिवाय अन्य हेतुसाठी करण्याबाबत तरतुद नसावी.

(ब) लागु असलेल्या ज्या कायद्यांखाली ह्या संस्था/संघटना/संघ स्थापन झाल्या आहेत, त्या कायद्याखाली आवश्यक असल्यानुसार, त्या संस्था/संघटना/संघांमध्ये किमान सभासद संख्या असेल, त्यांची पूर्व कामगिरी स्वच्छ असावी. कंपनीज् अधिनियम 1956 च्या कलम 25 खाली, किंवा कंपनीज् अधिनियम 2013 च्या कलम 8 खाली पंजीकृत झालेल्या कंपन्यांसाठी, किमान भागधारक/सभासदांच्या आवश्यकतेव्यतिरिक्त त्या कंपन्यांमध्ये, निरनिराळे भागधारण, किमान 3 स्वतंत्र संचालक, चांगले कॉर्पोरेट प्रशासन/नियंत्रण व ऑडिट समिती असणे आवश्यक आहे. ही आवश्यकता, अर्जदार कंपनीच्या किंवा तिला प्रायोजित करणा-या कंपनीच्या स्तरावर लागु केली जाऊ शकते.

(क) ह्या समितीने ह्याबाबतीत खास अपवाद केल्याचे सोडल्यास, अशा संस्था/संघटना/संघ, पंजीकरणाच्या तारखेपूर्वी किमान 5 वर्षे अस्तित्वात असाव्यात. ह्या 5 वर्षांपैकी, मागील 3 वर्षांमध्ये, ग्राहक संरक्षण/जाणीव, वित्तीय साक्षरता ह्या क्षेत्रात कामगिरी केलेली असावी, आणि अगदी मागील वित्तीय वर्षात, ग्राहक संरक्षण/जाणीव, वित्तीय साक्षरता ह्यामध्ये किमान एक तरी कार्यक्रम केलेला असावा.

**(4) कार्यकृतींची व्याप्ती**

ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीद्वारे वित्तीय सहाय्य केले जाण्यासाठीच्या कार्यकृतींची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

(1) पुढील विषयांवरील कार्यक्रम/प्रसंग आयोजित करणे - समाजाच्या दुर्लक्षित क्षेत्रामध्ये जाणीव निर्माण करणे, वित्तीय साक्षरतेचे फायदे, निरनिराळ्या वाहिन्यांवर उपलब्ध असलेल्या उत्पादांची माहिती, नोंदणीसाठीच्या कार्यरीती/प्रचलित पध्दती समजावून सांगणे, आणि मान्यताप्राप्त ठेवीदार संघ/एनजीओच्या सहकार्याने प्रत्यक्ष खाती उघडणे.

(2) सुरक्षित/काळजीमुक्त बँकिंगसह, वित्तीय साक्षरता देण्यासाठी, ठेवीदार/ठेवीदारांचे संघ ह्यांचेसाठी सेमिनार्स व चर्चासत्रे आयोजित करणे.

(3) ठेवीदारांचे शिक्षण व हक्कांची जाणीव इत्यादी संबंधाने असलेल्या प्रकल्पांना व संशोधन कार्यकृतींना अर्थ सहाय्य करणे.

(4) ठेवीदारांच्या जाणीव संबंधाने आयोजित केलेली प्रदर्शने, सेमिनार्स, टाउन हॉल मधील कार्यक्रम, दूरवर केलेले कार्यक्रम ह्यासाठीचे साहित्य निर्माण करणे/पुरविणे.

(5) वित्तीय साक्षरता, ग्राहक संरक्षण ह्यावरील मोहिमा माध्यमांमधून राबविणे.

(6) ग्राहक संरक्षण/जाणीव संबंधीचे इतर कार्यक्रम.

बीआर अधिनियम, 1949 च्या कलम 26 (अ)(4) अनुसार दिलेली ही एक निर्देशक यादी आहे आणि ह्या निधीचे उद्दिष्ट पुढे नेण्यासाठी, वेळोवेळी वाटेल त्यानुसार, रिझर्व बँक इतर कार्यकृतींचाही विचार करु शकते.

**(5) प्रकल्प योजना व वित्तीय सहाय्य**

बँक ठेवीदार शिक्षण व जाणीववर एखादा सफलताक्षम प्रकल्प/प्रस्ताव असलेली पंजीकृत संस्था/संघटना/संघ, ह्या निधीमधून सहाय्य मिळविण्यास पात्र असू शकतो.  त्यांच्या प्रायोजित प्रकल्पाची माहिती अंदाजे खर्च व अपेक्षित सहाय्य ह्यांचा तपशील देऊन, पंजीकृत संस्था, वित्तीय सहाय्यासाठी अर्ज करु शकतात.

ह्या समितीकडे पंजीकृत झालेल्या/मान्यता मिळालेल्या संस्था किंवा संघटना किंवा संघ ह्यांचा त्यांनी प्रायोजित केलेल्या कार्यकृतींवर अवलंबून, केवळ एकदाच किंवा भरपाईच्या स्वरुपात टप्प्याटप्प्याने मदत-अनुदानासाठी विचारात घेतल्या जाऊ शकतात.

**(6) इतर अटी**

(अ) ती विशिष्ट संस्था/संघटना/संघ हा एखादी विशिष्ट व्यक्ती, धर्म, समाज किंवा जात ह्यांच्या लाभासाठी नसावा.

(ब) त्या संस्था/संघटना/संघ ह्यांनी एक वचनपत्र द्यावे की, ह्या निधीमधून त्यांना मिळालेला पैसा, केवळ रिझर्व बँक/ह्या निधीने परवानगी दिलेल्या कार्यकृती व त्याबाबतचा खर्च ह्यासठीच वापरला जाईल - अन्य कोणत्याही कामासाठी नाही.

(क) ह्या संस्था/संघटना/संघ ह्यांनी वचनपत्र द्यावे की, ह्या निधीमधून त्यांना मिळालेल्या अनुदानाबाबत ठेवलेली सर्व पुस्तके व लेखा तसेच त्याचा वापर करण्याची रीत, ह्या निधीला/रिझर्व बँकेला/रिझर्व बँकेच्या प्रतिनिधीला उपलब्ध करुन देतील.

(ड) ह्या निधीमधून आर्थिक सहाय्य मिळालेल्या संस्था/संघटना/संघ, ठेवीदार शिक्षण व जाणीव बाबतच्या कार्यकृतींसाठी त्यांनी केलेल्या खर्चाबाबतचा, चार्टर्ड अकाऊंटंटने प्रमाणित केलेला अहवाल पाठवतील.

**(7) देखरेख**

संस्था/संघटना/संघ ह्यांच्या कार्यकृतींवर, पंजीकरण झाल्यानंतर देखरेख ठेवली जाईल. अशा पंजीकृत संस्था/संघटना/संघांच्या कार्यकृती, रिझर्व बँकेने परवानगी दिलेल्या कार्यकृतींना धरुन नसल्यास ही समिति त्या संस्था/संघटना/संघांचे पंजीकरण रद्द करील (अपंजीकृत करील) आणि समितीचा ह्याबाबतचा निर्णय अंतिम असेल. दिलेल्या निधीच्या बाबतीत, ह्या निधीच्या हितसंबंधाचा विचार करता, ही समिती तिला योग्य वाटेल अशी कारवाई (कायदेशीर कारवाईसह) आवश्यक तेव्हा करील.

**(8) अर्ज करण्याची रीत**

जोडपत्र 2 मध्ये दिल्याप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज केला जावा. ह्याशिवाय, अर्जदारांना, त्यांचा शेअर होल्डिंग साचा, सभासदत्व, वित्तीय विवरणपत्रे, गेल्या तीन वर्षांमध्ये राज्य/केंद्र सरकारकडून मिळालेल्या मंजु-या/अनुदान ह्यांच्या यादीसह अर्जाच्या फॉर्ममध्ये निर्देशित केलेली कागदपत्रे सादर करावी लागतील. इतर माहितीसह असलेले अर्ज, पुढील पत्त्यावर पाठवावेत.

मुख्य महाव्यवस्थापक,
बँकिंग विनियम विभाग,
भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय,
12 वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत,
शहीद भगतसिंग मार्ग,
मुंबई - 400 001

ह्या दुस-या फेरीमध्ये, जानेवारी 08, 2016 रोजी कामकाज बंद होईपर्यंत, वरील पत्त्यावर अर्ज स्वीकारले जातील. त्यांच्या पंजीकरणाबाबत अनुभव मिळाल्यानंतर, सातत्याने अर्ज स्वीकारले जातील. तथापि ह्या मार्गदर्शक तत्वांबाबत नियतकालिक पुनरावलोकन व सुधारणा/बदल केले जातील.

**(9) समितीच्या निर्णयासाठी कार्यरीत**

(अ) ही समिती, पंजीकरणाच्या वेळी

(1) सुरुवातीला ह्या अर्जाची छाननी करताना, अर्जदारांच्या प्रथमदर्शनी पात्रतेची खात्री करुन घेईल आणि अर्जदारांची सुयोग्यता ठरविण्यासाठी अतिरिक्त निकष लावू शकते.

(2) अशा अर्जदारांच्या अर्हतेचे मूल्यमापन करण्यासाठी व त्या अर्जदारांच्या इतर कार्यकृतींची तपासणी करण्यासाठी, ह्या निधीमधून आर्थिक सहाय्य मिळवू इच्छिणा-या संस्था/संघटना/संघ ह्यांच्या गेल्या 3 वर्षांचे ऑडिटेड लेखा व वार्षिक अहवाल विचारात घेईल.

(3) तो अर्जदार पंजीकरणासाठी योग्य/सुयोग्य आहे काय हे ठरविण्यासाठी, इतर प्राधिकरणांकडे (रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयांसह), तिला योग्य वाटतील अशा चैाकशा करील.

(4) अर्जाची छाननी करण्याचे काम एका छाननी समितीकडे सोपवील - की ज्यात, इतर बाबींसह, ह्या समितीमध्ये नसलेले सभासद असू शकतील.

(ब) वित्तीय सहाय्य देतेवेळी ही समिती

(1) निधी देण्यासाठी प्राधिकृत करण्यापूर्वी, प्रस्ताव व अनुदानाचे अंतिम उपयोग ह्यांची तपासणी करील.

(2) अशा संस्था/संघटना/संघ ह्यांना आधीच दिलेल्या निधीच्या अंतिम उपयोगाबाबत माहिती मागवील किंवा कोणत्याही प्रकारे त्याची पडताळणी करील.

(3) प्रायोजित प्रकल्प हा, ह्या योजनेच्या उद्दिष्टांना पुढे नेणाराच आहे ह्याबाबत समाधान करुन घेण्यासाठी, इतर प्राधिकरणांकडे (रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयासह) तिला योग्य वाटतील अशा चैाकशा करील.

**(10) पंजीकरण व वित्तीय सहाय्य देणे**

(अ) संस्था/संघटना/संघ ह्याचे पंजीकरण व त्यानंतर करावयाचे/केलेले निधी वाटप ही दोन टप्प्यांची प्रक्रिया असून त्यांना वेगवेगळी वागणुक दिली जावी. पंजीकरण झाल्यानंतर, प्रकल्पांवर आधारित असे निधी-वाटप केले जाईल आणि ती एक वेगळी प्रक्रिया असेल.

(ब) ठेवीदार शिक्षण व जाणीव वर, सफलताक्षम प्रकल्प असलेल्या संस्था/संघटना/संघ ह्या निधीमधून अर्थ सहाय्य मिळण्यास पात्र असू शकतात. तथापि, केवळ पंजीकरण केले आहे म्हणून, असे संस्था/संघटना/संघ ह्या निधीमधून अर्थ सहाय्य मिळण्यास आपोआपच पात्र ठरत नाहीत.

(क) पारदर्शकतेची खात्री होण्यासाठी, पंजीकृत झालेल्या संस्था/संघटना/संघांची यादी, आरबीआयच्या वेबसाईटवर प्रदर्शित केली जाईल.

**जोडपत्र - 2**

## ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी रिझर्व बँकेमध्ये पंजीकरण करण्यासाठीचा अर्ज

| अनुक्रमांक | तपशील | |
|---|---|---|
| (1) | अर्जदाराचे नाव | |
| (2) | अर्जदाराचा वर्ग/प्रकार (ट्रस्ट/सोसायटी/खाजगी कॉर्पोरेट/सार्वजनिक कॉर्पोरेट/विश्वविद्यालय/अन्य शैक्षणिक संस्था/अन्य कोणतीही संस्था/निधी) व स्थापना केली जाण्याचा वटहुकुम. | |
| (3) | पंजीकरण क्र. व तारीख | |
| (4) | पंजीकृत कार्यालयाचा संपूर्ण पत्ता (प्रमुख व्यक्तीचे आणि संपर्क व्यक्तीचे नाव, हुद्दा, टेलिफोन व फॅक्स क्र. आणि ई-मेल आयडीसह) | |
| (5) | अर्जदाराच्या कॉर्पोरेट कार्यालयाचा (पंजीकृत कार्यालयापेक्षा वेगळा असल्यास) संपूर्ण पत्ता व संपर्क तपशील | |
| (6) | अर्जदार संस्थेमधील व्यक्ती व गटांच्या भागधारणाची माहिती. ह्यामध्ये नातेसंबंध असल्यास निर्देश करावा. | |
| (7) | अर्जदाराच्या सभासदांची/भागधारकांची संख्या | |
| (8) | अर्जदार, एखाद्या नियंत्रक मंडळ/व्यवस्थापन समितीच्या प्रशासनाखाली आहे काय ? | |
| (9) | अर्जदारांची उद्दिष्टे/पोट नियम ह्यामध्ये, त्याच्या उत्पन्न किंवा ॲसेट्सचा उपयोग, धर्मादाय हेतु व्यतिरिक्त अन्य हेतूंसाठी करण्याबाबत तरतुद आहे काय? होय असल्यास तपशील द्यावा. | |
| (10) | एखाद्या विशिष्ट व्यक्ती/धर्म/समाज किंवा जातीच्या हितासाठी अर्जदार स्थापन करण्यात आला आहे काय? होय असल्यास तपशील द्यावा. | |
| (11) | गेल्या पाच वर्षांदरम्यान अर्जदाराच्या कार्यकृती केल्या गेल्या असल्याच्या ठिकाणांचे संपूर्ण पत्ते. | |
| (12) | अर्जदाराच्या लेखा गेल्या तीन वर्षांदरम्यान ऑडिट केल्या होत्या काय? होय असल्यास, त्या ऑडिट एजन्सीचे नाव, संपर्क तपशील आणि ऑडिटची तारीख | |
| (13) | अर्जदाराकडे अंतर्गत नियंत्रण प्रणाली आहे काय? अर्जदार कॉर्पोरेट संस्था असल्यास त्यांचेकडे ऑडिट समिती आहे काय? | |
| (14) | अर्जदाराच्या विनियमांची नावे व पत्ते, आणि गेल्या तीन वर्षांमध्ये, भारतामधील किंवा परदेशातील विनियमकांनी, मुख्य प्रायोजकांविरुध्द केलेल्या विनियामक कारवाईचा तपशील | |
| (15) | (अ) मुख्य प्रायोजक/भागधारक ह्यांच्याविरुध्द केलेल्या | |

| | | |
|---|---|---|
| | (असल्यास) फौजदारी/दिवाणी खटल्यांचा तपशील.<br>(ब) गेल्या तीन वर्षात त्या संस्थेच्या विरुध्द दाखल/पंजीकृत केलेल्या तक्रारींची संख्या व स्थिती, तक्रार निवारण करण्यासाठीची यंत्रणा. | |
| (16) | अर्जदाराच्या नावे असलेल्या खात्याचा क्रमांक, बँक, शाखा, व कर्ज सुविधा ह्यांचा तपशील. | |
| (17) | नोडल व्यक्तीच्या संपर्कासाठी तिचे नाव, फोन/मोबाईल क्र. व ई-मेल. | |

(18) संस्था/संघटना/संघाच्या गेल्या 5 वर्षातील मुख्य कार्यकृती :

| **कार्यकृतीचे नाव व उद्देश** | **वर्ष** | **व्याप्ति** | | | **झालेला खर्च (लाखांमध्ये)** | **वरील खर्चासाठी निधी कोठून मिळाला.** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **स्त्रिया** | **मुले** | | |
| | | | | | | |

(19) ग्राहक शिक्षण व संरक्षणासंबंधाने, संस्था/संघटना/संघ ह्यांच्या गेल्या 5 वर्षांमधील मुख्य कार्यकृती.

| **कार्यकृतीचे नाव व उद्देश** | **वर्ष** | **व्याप्ति** | | | **झालेला खर्च (रु.लक्ष)** | **ह्या खर्चासाठी कोणता निधी वापरला.** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **स्त्रिया** | **मुले** | | |
| | | | | | | |

(20) मागील 3 वर्षांमधील संस्था/संघटना/संघाच्या आर्थिक स्थिती/विवरणपत्राचा सारांश

| वर्ष | एकूण उत्पन्न/आय (रु. लक्ष) | खर्चाचे एकूण प्रदान (रु. लक्ष) | अतिरिक्त (रु. लक्ष) | अतिरिक्त रक्कम कशी वापरण्यात आली किंवा तुटीबाबत कोठून निधी मिळाला. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(21) मागील 3 वर्षांमध्ये केंद्र सरकार/राज्य सरकार/इतर सरकारी एजन्सी/इतर एजन्सीकडून मिळालेल्या अनुदानांचा तपशील.

| **मंजुरी** | **तारीख** | **रक्कम (रु. लाख)** | **योजना** | **निधीदात्या एजन्सीचा पत्ता** | **हेतु** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(22) मागील 3 वर्षांमध्ये, केंद्र सरकार/राज्य सरकार/इतर सरकारी एजन्सीज्/इतर एजन्सींकडे अनुदानासाठी अर्ज केलेल्या परंतु फेटाळल्या गेलेल्या अनुदानांचा तपशील.

| **मंजुरी** | **तारीख** | **रक्कम (रु. लाख)** | **योजना** | **निधीदात्या एजन्सीचा पत्ता** | **हेतु** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(23) मागील 3 वर्षांमध्ये मिळालेल्या विदेशी अर्थसहाय्याची माहिती

| देश | संस्था | हेतु | तारीख | रक्कम (रु. लाख) | एफसीआरए पंजीकरण क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(24) संस्था/संघटना/संघाच्या महत्वाच्या अधिका-यांचा तपशील असलेली, पुढील नमुन्यातील यादी. स्वतंत्र संचालकांचा (कंपन्यांबाबत) तपशील पुढील नमुन्यात वेगळा दिला जावा.

| अनुक्रमांक | नाव व पत्ता | लिंग (पु./स्त्री) | वय | हुद्दा | शैक्षणिक अर्हता | व्यवसाय | वार्षिक उत्पन्न (रु. लाख) | टेलिफोन क्र. (लॅड लाईन व मोबाईल दोन्हीही) व फॅक्स क्र. | ई-मेल आयडी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

प्रमाणपत्र : मी येथे घोषित करतो की वरील माहिती प्रत्येक बाबतीत खरी आहे.

संस्था/संघटना/संघाचे सचिव/अध्यक्ष ह्यांचे नाव व सही (शिक्क्यांसह)

स्थळ :

तारीख :

**<u>कागदपत्रांची यादी (प्रमाणित प्रती)</u>**

**(1) <u>कॉर्पोरेटसच्या बाबतीत</u>**

(1) कॉर्पोरेटचा थोडक्यात इतिहास/पार्श्वभूमी

(2) कॉर्पोरेटची रचना दर्शविणारा संस्थात्मक साचा

(3) कॉर्पोरेटचे सर्टिफिकेट ऑफ इन्कॉर्पोरेशन व मेमोरॅडम अँड आर्टिकल्स ऑफ असोशिएशन, नियम, विनियम, उद्दिष्टे

(4) सार्वजनिक कंपन्यांसाठी व्यवसाय सुरु झाल्याचे प्रमाणपत्र

(5) पॅन व टॅन दिल्याचे पत्र आणि गेल्या 3 वर्षातील आयटी मूल्यमापन आदेश/आयटी रिर्टन्स

(6) प्रायोजक, तसेच व्यवस्थापन, त्यांचे भागधारण ह्यांचा तपशील. इतर संस्थांमधील त्यांच्या हितसंबंधाचा तपशील

(7) प्रायोजक गट कंपन्या/सिस्टर कंपन्या व भागधारकाचे टक्के ह्यांचा तपशील

(8) गेल्या तीन वर्षाचे, ऑडिटेड लेखा व वार्षिक अहवाल

(9) कॉर्पोरेट संस्थेच्या प्रमुखाने सही केलेले वचनपत्र की, ह्या निधीमधून मिळालेल्या पैशाचा उपयोग, केवळ, रिझर्व बँक/हा निधी ह्यांनी परवानगी दिलेल्या कार्यकृती व त्याबाबतच्या खर्चासाठीचा केला जाईल - अन्य कोणत्याही हेतूंसाठी नाही.

(10) कॉर्पोरेट संस्थेच्या प्रमुखाने सही केलेले वचनपत्र की, ह्या निधीमधून मिळालेली अनुदाने व त्यांचा उपयोग ह्याबाबत त्यांनी ठेवलेली पुस्तके व लेखा, हा निधी/रिझर्व बँक/रिझर्व बँकेचे प्रतिनिधी ह्यांना उपलब्ध करुन दिल्या जातील.

(11) ग्राहक संरक्षण/जाणीव कार्यक्रमांमध्ये गेल्या तीन वर्षांमधील योगदानासाठी, कॉर्पोरेट संस्थेच्या प्रमुखाने सही केलेले प्रमाणपत्र.

(12) केंद्र सरकार/राज्य सरकार/इतर सरकारी एजन्सीज्/इतर एजन्सीज् कडून गेल्या तीन वर्षात मिळालेल्या अनुदानाचे मंजुरी आदेश

(13) एफसीआरए खालील पंजीकरण प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, आणि गेल्या 3 वर्षात विदेशातून मिळालेल्या आर्थिक सहाय्याच्या तपशीलाची दुजोरा देणारी कागदपत्रे

(14) संस्थेच्या सर्व बँकर्सची व शाखांची नावे व पत्ते असलेली यादी

(15) कॉर्पोरेट संस्थेच्या सभासदांची/भागधारकांची यादी

(16) रिझर्व बँकेकडे पंजीकरण करण्यासाठी संचालक मंडळाने पारित केलेल्या ठरावाची प्रत

(17) अंतर्गत नियंत्रण प्रणाली, ऑडिट समिती व कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा तपशील.

**(2) <u>कॉर्पोरेट्स सोडून (ट्रस्ट, सोसायट्या, विश्वविद्यालये, इतर शैक्षणिक संस्था, इतर संस्था, निधी इ.) अन्य अर्जदारांसाठी</u>**

(1) संस्था/संघटना/संघाचा थोडक्यात इतिहास/पार्श्वभूमी

(2) संस्था/संघटना/संघ ह्यांची रचना दर्शविणारा संस्थात्मक साचा

(3) संस्था/संघ/संघटना ह्यांचे नियम, विनियम, पोट कायदे, उद्दिष्टे ह्यासह, तिच्या पंजीकरण प्रमाणपत्राची प्रत.

(4) प्रायोजक, तसेच व्यवस्थापन, त्यांचे भागधारण ह्यांचा तपशील. इतर संस्थांमधील त्यांच्या हितसंबंधाचा तपशील

(5) प्रायोजक गट कंपन्या/सिस्टर कंपन्या व भागधारकाचे टक्के ह्यांचा तपशील

(6) पॅन व टॅन दिल्याचे पत्र आणि गेल्या 3 वर्षातील आयटी मूल्यमापन आदेश/आयटी रिर्टन्स

(7) संस्था/संघटना/संघ ह्यांचे मागील 3 वर्षांच्या ऑडिट केलेल्या लेखा व वार्षिक अहवाल

(8) संस्था/संघटना/संघाच्या च्या प्रमुखाने सही केलेले वचनपत्र की, ह्या निधीमधून मिळालेल्या पैशाचा उपयोग, केवळ, रिझर्व बँक/हा निधी ह्यांनी परवानगी दिलेल्या कार्यकृती व त्याबाबतच्या खर्चासाठीचा केला जाईल - अन्य कोणत्याही हेतूंसाठी नाही.

(9) संस्था/संघटना/संघाच्या प्रमुखाने सही केलेले वचनपत्र की, ह्या निधीमधून मिळालेली अनुदाने व त्यांचा उपयोग ह्याबाबत त्यांनी ठेवलेली पुस्तके व लेखा, हा निधी/रिझर्व बँक/रिझर्व बँकेचे प्रतिनिधी ह्यांना उपलब्ध करुन दिल्या जातील.

(10) ग्राहक संरक्षण/जाणीव कार्यक्रमांमध्ये गेल्या तीन वर्षांमधील योगदानासाठी, संस्था/संघटना/संघाच्या प्रमुखाने सही केलेले प्रमाणपत्र.

(11) केंद्र सरकार/राज्य सरकार/इतर सरकारी एजन्सीज्/इतर एजन्सीज् कडून गेल्या तीन वर्षात मिळालेल्या अनुदानाचे मंजुरी आदेश.

(12) एफसीआरए खालील पंजीकरण प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, आणि गेल्या 3 वर्षात विदेशातून मिळालेल्या आर्थिक सहाय्याच्या तपशीलाची दुजोरा देणारी कागदपत्रे

(13) संस्थेंच्या सर्व बँकर्सची व शाखांची नावे व पत्ते असलेली यादी

(14) संस्था/संघटना/संघाच्या सभासदांची यादी

(15) रिझर्व बँकेकडे पंजीकरण करण्यासाठी अर्ज करण्याबाबतचा ठराव.

(16) अंतर्गत नियंत्रण प्रणालीचा तपशील.